अत्यंत तातडीचे

क्र.वि.नि.वि.वि/३२१/४०५/२०११,
मुंबई - ४०० ०३२.
९ डिसेंबर, २०११.

**परिपत्रक :-**

१) विद्यापीठाचे संचालक व विभागप्रमुख,
२) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये. (वैद्यकीय महाविद्यालये वगळुन)

**संदर्भ -: शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक:- उशिसं/अशाप/राशिपु २०११-१२/६६९८ दिनांक १ डिसेंबर, २०११**

**विषय-: राज्य शिक्षक पुरस्कार २०११-२०१२ विद्यापीठ / महाविद्यालयीन शिक्षकांची शिफारस करणेबाबत.**

महोदय/महोदया,

आपणांस विदीत आहे की, विद्यापीठीय / महाविद्यालयीन स्तरावर आदर्श शिक्षकांचा शोध देऊन शासनातर्फे अशा आदर्श शिक्षकांना राज्य शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते

महाराष्ट्रशासनातर्फे **२०११-२०१२** सालासाठी विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावर राज्य शिक्षक पुरस्कार प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक निवड समिती नेमण्यात येणार आहे. आपल्या अधिपत्याखालील विविध विद्याशाखांतील विद्यापीठ/महाविद्यालयीन शासनमान्य संस्थेतील शिक्षक म्हणून ज्यांची किमान १५ वर्षे सेवा झालेली आहे, ज्यांनी विशेष गुणवत्ता व अर्हता धारण केली आहे अशा किमान एक किंवा दोन पात्र शिक्षकांचे प्रस्ताव विद्यापीठाला सादर करावेत, सदर प्रस्ताव विद्यापीठ निवड समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील.

तसेच ज्या शिक्षकांची शिफारस करावयाची, त्यांची माहिति अ,ब,क,ड,ई, व फ (संबधीत शिक्षकांची १० ते□१५ ओळीत संक्षिप्त माहिती/ त्यांचा दुरध्वनीक्रमांक, विद्यापीठ/महाविद्यालयाचा दुरध्वनी क्रमांक व घरचा पूर्ण पत्ता) आणि **दोन पासपोर्ट आकाराचे कृष्णधवल छायाचित्र, विद्यापीठ मान्यता प्रत्राची प्रत, तीन प्रतीत प्रस्ताव व प्रस्तावाची प्लॉपी (आय.एस.एम.विंडो ९८) तसेच शिक्षकाबाबतचा पोलिस अहवाल अन्य सर्व कागद पत्रांच्या सत्य प्रती प्रस्तावासोबत पाठविणे आवश्यक आहे.**

कृपया मागे पाहा

या परिपत्रकासोबत सहा विवरण पत्रे व शिक्षकांची निवड करण्यासाठी लागू करावयाचे सुधारीत निकषांची प्रत जोडलेली आहे. पैकी (ब) हे विवरण पत्र आपण निश्चित केलेल्या पात्र शिक्षकांच्या नावाने त्यांच्या स्वाक्षरीनिशी भरुन घ्यावे, तसेच प्रपत्र (अ),(ब),(क),(ड),(इ), व (फ) ही सर्व विवरण पत्रे व त्यातील सर्व रकाने मराठी मध्ये भरुन आपण शिफारस करुन **पाच वर्षाच्या** गोपनीय अहवालासह (२००७ ते २०११) सहाय्यक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन व विकास विभाग, क्र. १३२, मुंबई विद्यापीठ, मुख्य इमारत, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे **दिनांक २१ डिसेंबर, २०११** पर्यंत पाठवून देण्याची व्यवस्था करावी.

कृपया आपण हे परिपत्रक सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे व **दिनांक २१ डिसेंबर, २०११** पूर्वी विहित गुणवत्ता व अर्हताधारक धारण करणा-या शिक्षकांचे प्रस्ताव विद्यापीठाला प्राप्त होतील असे पहावे. तसेच **२१ डिसेंबर, २०११** नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**टिप्पणी :-**

**१) पाच वर्षाचा गोपनीय अहवाल (C.R.)**
**२) पोलिस अहवाल,**
**३) संबधित शिक्षकांविरूध्द महाविद्यालयीन व अन्यप्रकारची अशी कोणतीही चौकशी किंवा न्यायालयीन चौकशी असल्यास त्या बद्दलचा सविस्तर अहवाल. तसेच**
**४) शिक्षकाने गेल्या पाच वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ७५ टक्के गुण प्राप्त केलेले असावेत.**

**विशेष सुचना:-**

**अ. विद्यापीठातील विभाग प्रमुख व संचालक यांनी आपला प्रस्ताव मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांचे मार्फत सादर करावा तसेच**
**ब. शासन मान्य संस्थेचे संचालक/महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी आपला प्रस्ताव मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे, यांचे मार्फत सादर करावा तसेच**
**क. महाविद्यालयीन प्राचार्य यांनी आपला प्रस्ताव संस्था चालक यांचे मार्फत सादर करावा.**

आपला विश्वासू

सही/-

(प्राचार्य. (डॉ.) राजपाल श्री. हांडे)
(संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ)

**प्रपत्र 'अ'**

२०११-२०१२ या वर्षासाठी महाविद्यालयातील / विद्यापीठातील
प्रंशसनीय शिक्षकांना राज्य पुरस्कार

| | |
|---|---|
| १) शिक्षकांचे नाव | |
| २) महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे नांव | |
| ३) धारण केलेले पद | |
| ४) अध्यापनाचा अनुभव (वर्षाची संख्या) | |
| ५) पुढील माहिती आवर्जून द्यावी | |
| १) शिकवण्या घेतात का? | |
| २) राजकीय/श्रमिक संघाच्या (ट्रेड युनियन) कार्यामध्ये भाग घेतात काय? | |
| ३) त्यांना तक्रार करण्याची व न्यायालयाकडे धाव घेण्याची सवय आहे काय? | |
| ४) ते वक्तशीर आहेत काय? | |
| टीप -शिफारशी पक्क्या करतांना वरील माहितीस ७५: टक्के महत्व देण्यात यावे. | |
| ६) शिक्षकाने त्यांच्या/तीच्या शिकवण्याच्या प्रभाव पाडण्यासाठी कोणताही नाविन्यपुर्ण प्रयोग केला आहे काय संशिप्त टीप द्यावी. | |
| ७) वर्ग शिक्षण अधिक रोचक बनविण्यासाठी शिक्षकाने लोकमाध्यमासह (मास मिडीया) कोणत्या प्रकारची शिक्षण साधने वापरली आहेत. | |
| ८) शिक्षक बुध्दीवान व कमकुवत विद्यार्थ्याकडे खास लक्ष पुरवुन त्यांना मदत करतो काय? असल्यास तपशील द्यावा. | |
| ९) शिक्षकाला गेल्या दहा वर्षामध्यें शाळेकडुन, समाजाकडुन, शासनाकडुन कोणतीही मान्यता पुरस्कार व बक्षिसे मिळाली आहेत काय? असल्यास तपशील द्यावा. | |

ठिकाण

दिनांक

स्वाक्षरी
विद्यापीठाचे संचालक/विभाग प्रमुख
प्राचार्य संलग्नित महाविद्यालय

कृपया मागे पाहा

**प्रपत्र 'ब'**

२०११- २०१२ **या वर्षासाठी महाविद्यालयातील/विद्यापीठातील प्रशासनीय शिक्षकांना राज्य पुरस्कार विद्यापीठाने/महाविद्यालयाने शिफारस केलेल्या शिक्षकाने द्यावयाचा व्यक्तिगत तपशील**

**१) शिक्षकांचे संपूर्ण नाव :**

**२) विद्यापीठ/महाविद्यालय :**

**३) पदनाम :**

**४) जिल्हा :**

**५) जन्म दिनांक :**

**६) वडिलांचे नाव :**

**७) कायमचा पत्ता व असल्यास दुरध्वनी क्रमांक :**

**८) शैक्षणिक अर्हता (मिळालेल्या श्रेणीसह) :**

**९) नोकरीचा अभिलेख :**

**१०) व्यावसायिक संघटनेचे सदस्यत्व व त्या संघटनेमधील सहभाग :**

**११) संशोधन कार्याचा तपशील :**

**१२) महत्वाच्या प्रकाशनांचा तपशील :**

| | प्रकाशनाचे नाव | प्रकाशक | प्रकाशन वर्ष | पाठ्यपुस्तक म्हणून विहीत केले आहे काय? | ज्यासाठी विहित केले ती परिक्षा किंवा वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | | |

**१३) विदेशातील प्रवासाचा तपशील देश, कालावधी व भेटीचे प्रयोजन :**

**१४) वर समाविष्ट नसलेली कोणतीही विशेष अर्हता व कामगिरी :**

**ठिकाण**

**दिनांकः** **शिक्षकाची स्वाक्षरी**

**प्रपत्र 'क'**

**<u>प्रमाणपत्र</u>**

**याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (आडनाव प्रारंभ करून संपूर्ण नाव)**

**पदनाम प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . यांचा गतोतिहास निष्कलंक असून, त्यांचे पूर्वचारित्र्य निर्दोष आहे.**

**त्यांच्या विरूध्द विभागीय व अन्यप्रकारची अशी कोणतीही चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही चालू नाही.**

**ठिकाण :**

**दिनांक :**

**स्वाक्षरी**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे,
**विद्यापीठाचे संचालक/विभाग प्रमुख**
**प्राचार्य संलग्नित महाविद्यालये**

कृपया मागे पाहा

## प्रपत्र 'ड'

## महाविद्यालयांनी/विद्यापीठीय विभागांनी राज्य पुरस्कारासाठी शिफारस केलेल्या शिक्षकांचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

| शिक्षकाचे संपुर्ण नाव | पदनाम | अर्हता | वय व नेमणुक दिनांक | एकूण सेवा | शिक्षकांच्या महत्वाच्या कामाचे संक्षिप्त वर्गिकरण (२० ओळी) | विद्यापीठ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

**ठिकाण :**

**दिनांक :**

**स्वाक्षरी**
**विद्यापीठाचे संचालक/विभाग प्रमुख**
**प्राचार्य संलग्नित महाविद्यालये**

१.
२.
३.
४.
५.
६.
७.
८.

## प्रपत्र 'इ'

## महाविद्यालयांच्या/विद्यापीठाच्या शिफारस केलेल्या शिक्षकांचा थोडक्यात परिचय

| शिक्षकांचे नांव व पदनाम | पत्ता (दूरध्वनी क्रमांक) | थोडक्यात माहिती |
|---|---|---|
| | | |

ठिकाण :

दिनांक :

स्वाक्षरी
विद्यापीठाचे संचालक/विभाग प्रमुख
प्राचार्य संलग्नित महाविद्यालये

कृपया मागे पाहा

## प्रपत्र 'फ'

### (राज्य शिक्षक पुरस्काराकरिता संक्षिप्त माहिती)

१) नाव, पत्ता व दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :

२) जन्म दिनांक :

३) विद्यापीठ/महाविद्यालयाचे नाव :

४) शैक्षणिक अर्हता :

५) संक्षिप्त माहिती :
(संबंधित शिक्षकाच्या कार्याविषयीची संक्षिप्त माहिती सलग १० ते १५ ओळीत पासपोर्ट आकाराचे दोन कृष्णधवल छायाचित्रांसह द्यावी)

**********************